महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४००००१
www.dvet.gov.in, desk८@dvet.gov.in; ०२२-२२६२०६०४/२९३

क्रमांक -०८/मान्यता/संलग्नता/जाहिरात-२०२२/६६ दिनांक - ६/९/२०२२

## जाहिरात

## शासन मान्यता नसलेल्या / अनधिकृत संस्थांमध्ये प्रवेश न घेणेबाबत

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत ९ वी, १० वी स्तरावर पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व ११ वी, १२ वी स्तरावर द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम ासकीय, अशासकीय अनुदानित, अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थांमार्फत राबविले जातात. तसेच शासकीय व अशासकीय कायम विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून डिजीटी, नवी दिल्ली यांचे ान्यताप्राप्त अभ्यासक्रम राबविले जातात. संचालनालयाच्या http://www.dvet.gov.in या संकेतस्थळावर सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची ादी उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत विविध ३६ गटात (Sector) कौशल्य (Skill), व्यवसाय शिक्षण (Vocational Education) व व्यवसाय प्रशिक्षण /ocational Training) संबंधी प्रमाणपत्र (Certificate) व पदविका (Diploma व Advance Diploma) अभ्यासक्रम शासन मान्यता व मंडळाद्वारे संलग्नता प्राप्त शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थांमार्फत ाबविण्यात येत आहेत. मंडळाच्या https://msbsd.edu.in या संकेतस्थळावर सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी उपलब्ध आहे.

महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम ्मांक २०) नुसार पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास व जाहिरात करण्यास मनाई रण्यात आली आहे.

असे निदर्शनास आले आहे की, शासकीय मान्यता नसलेल्या/अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून शुल्क आकारून प्रवेश घेण्यास प्रवृत्त रतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील उपरोक्त परिच्छेदांत नमूद अभ्यासक्रमांमधून प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाची मान्यता नसलेल्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची मान्यता नसलेल्या संस्थांमध्ये/अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ नये. अनधिकृत संस्थेच्या भूलथापांना, त्यांच्या खोट्या दाव्यांना व जाहिरातींना बळी न पडता संस्था व भ्यासक्रमांची मान्यता शासनाच्या व संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://www.dvet.gov.in, https://msbsd.edu.in तपासून खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रांसाठी राज्यातील ंस्था व अभ्यासक्रम मान्यतेबाबत व अनधिकृत संस्थांच्या तक्रारीबाबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण ंडळ अथवा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा.

- sd -
दिगांबर अंबादास दळवी
सक्षम प्राधिकारी तथा संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

ठिकाण : मुंबई
दिनांक :

DGIPR-2022-23/2737

Mumbai Main
Page No. 8 Sep 08, 2022
Powered by: erelego.com